# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.09.2025** **वार- मंगळवार**

---

**मंत्रीमंडळ**

**ओला दुष्काळ जाहीर करण्याची कोणतीच तरतूद नियमात नसल्याने आजवर कधीच ओला दुष्काळ जाहीर झाला नाही. मात्र, दुष्काळी टंचाईच्या काळात ज्या सवलती आणि उपाययोजना केल्या जातात त्या सर्व आता या अतिवृष्टीच्या काळात लागू करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मंत्रालयात आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. राज्यात आतापर्तंच्या अतिवृष्टीने ६० लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. ऑगस्टपर्यंत झालेल्या नुकसानीपोटी २ हजार २१५ कोटींच्या निधी वितरणाला यापुर्वीच मान्यता देण्यात आली आहे. या मदतीसाठीची ईकेवायसीची अट शिथिल करून ॲग्रीस्टॅकच्या आधारे निधी वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने पुढील दोन-तीन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची ही रक्कम जमा होईल अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.**

**ऊसगाळप**

**राज्याचा ऊस गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरू होणार असल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत माहिती दिली. राज्यातल्या ३३ जिल्ह्यांना अतिवृष्टीचा जास्त फटका बसला आहे. प्राथमिक अंदाजानुसार सव्वा ते दीड कोटी एकर क्षेत्राचं नुकसान झालं आहे. दरम्यान नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी कृषीविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी १ दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मदत देणार आहेत. यातून ६ कोटी रुपयांहून अधिक निधी जमा होईल, असं ते म्हणाले.**

**ओवेसी**

**जनतेचा सरकारवरील विश्वास उडाला तर देशाची प्रगती होणार नाही. तसच जनतेला पर्यायी राजकारणाची गरज आहे, मतदारांना सक्षम पर्याय मिळायला हवा, असं प्रतिपादन एमआयएमचे अध्यक्ष आणि खासदार असदुद्दीन**

**ओवेसी यांनी आज पुण्यात केलं. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने ओवेसी यांच्याशी वार्तालापचं आयोजन केलं होतं. त्यावेळी ते बोलत होते. मुस्लिम समाजाचं राजकारणातील टक्का कमी होत असल्याचं    ओवेसी म्हणाले.**

**<u>सुळे</u>**

**महिला सर्व क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असून  समाज सेवेतही आघाडीवर आहेत हे त्यांचे खऱ्या अर्थाने मोठेपण आहे. असे गौरवोद्गार खासदार सुप्रिया सुळे यांनी काढले. त्या आज पुण्यातील भिलारेवाडी येथील श्री चामुंडा भवानी माताजी जैन मंदिरातर्फे विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या स्त्रीयांचा सन्मान करण्यात आलं त्यावेळी सुळे दूरदृश्य प्रणालीद्वारे कार्यक्रमात सहभागी होवून बोलत होत्या.**

**<u>शेटे</u>**

**छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्मिलेल्या दुर्गांचे योग्य जतन आणि संवर्धनाची जबाबदारी आपली आहे, याचे भान ठेवून दुर्गांचे उत्तम व्यवस्थापन केले पाहिजे कारण हे दुर्ग जिवंत शिवशाहीर आहेत, असे उद्गार प्रसिद्ध इतिहास अभ्यासक आणि शिवव्याख्याते मोहन शेटे यांनी काढले. ते काल पुण्यात महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत, पुरातत्त्व आणि वस्तूसंग्रहालये संचालनालय आणि सृजनसभा यांच्यामार्फत आयोजित सेवा पंधरवडा उपक्रमातील  व्याख्यानात बोलत होते. शिवचरित्रकार गजाननराव मेहेंदळे यांच्या स्मृतींना हे शिवव्याख्यान समर्पित करण्यात आले होते.**

**<u>पदवीधर</u>**

**पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने मतदार याद्या करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला असून मतदार नोंदणीची सुरुवात झाली आहे. पात्र मतदारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदवावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.या संदर्भातील माहिती देण्यासाठी विधानभवनात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.**

**<u>महावितरण</u>**

**पुणेमहावितरण'च्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांच्या १५७ किलोवॅटपर्यंत वीजभारवाढीच्या ऑनलाइन अर्जांना 'महावितरण'कडून आता स्वयंचलित पद्धतीने मंजुरी मिळणार आहे. 'महावितरण'च्या संकेतस्थळावर ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. सेवा पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.**

**स्वनासप**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये १७ सप्टेंबर  रोजी हे “स्वस्थ नारी, सशक्त परिवार” हे अभियान सुरू झाले असून आतापर्यंत या शिबिरामध्ये ५० हजाराहून अधिक महिला आणि बालकांनी विविध तपासण्या आणि उपचारांचा लाभ घेतला आहे.  याशिवाय आयुष्मान भारत डिजिटल मिशन, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच आयुष्मान वय वंदना कार्ड यांचे वितरणदेखील यावेळी करण्यात आले.**

**वृक्षलागवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने शहरात एक लाख देशी वृक्षांची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आलं आहे. या उपक्रमात पहिल्या टप्प्यात ५० हजार देशी वृक्ष लागवड करण्यात येत असून या मोहिमेचा प्रारंभ  डुडूळगाव इथं करण्यात आला. प्रत्येक  नागरिकाने एक तरी झाड लावावे असे आवाहन पालिका आयुक्त शेखरसिंह यांनी यावेळी केलं.**

**हवामान**

**पुणे आणि परिसरात आज  सकाळ पासून आकाश ढगाळ असून कमाल तापमान २८ तर किमान तापमान १९ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही  याचं स्वरुपाच तापमान राहण्याचा अंदाज हवामान विभागान वर्तवला आहे.**

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**